

# बीए उर्दू

कादरभाई सुपारीवाले (ट्रस्ट) आणि आयेशाबाई स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने बीए उर्दू हा मुस्लिम मुलींसाठीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमामुळे अनेक मुस्लिम मुलींना शिक्षणाचे एक नवे दालन खुले झाले. मुस्लिम समाजात आजही स्त्रियांना शिक्षण दिले जात नाही. या स्त्रिया घराबाहेर पडत नाही. त्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या असतात. या स्त्रियांपर्यंत पोहोचून मुक्त विद्यापीठाने त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अशा अनेक स्त्रियांनी उर्दू भाषेतून बीए ही पदवी मिळवली आहे. गेल्या वर्षीपासून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. पडघ्यापासून ते व्ही.टी. पर्यंत सर्व ठिकाणच्या मुस्लिम स्त्रियांपर्यंत मुक्त विद्यापीठांना पोहोचून त्यांना या विषयाची माहिती दिली. सध्या या विषयाच्या पूर्वतयारीसाठी तब्बल ९०० विद्यार्थी पदवीसाठी ५०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.